पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

**दिनांक- १६/०३/२०२१**

## मौजा ग्यारापत्ती व कटेझरी येथे स्वातंत्र्यानंतर प्रथमच जागतिक महीला दिन उत्साहात साजरा

- ***गडचिरोली पोलीस दल व लॉयन्स क्लब नागपूर यांचा पुढाकार.***

जगभरात विविध ठिकाणी जागतिक महीला दिनाचे औचित्य साधुन विविध कार्यक्रम पार पाडले जात असतात. परंतु गडचिरोली जिल्हा मुख्यालयापासुन अत्यंत दुरवर असलेल्या अतिदुर्गम भागातील नागरिकांना जागतिक महीला दिनाची कल्पनाच नसल्यामुळे मा. पोलीस अधीक्षक श्री. अंकित गोयल यांचे मार्गदर्शनाखाली गडचिरोली पोलीस दल व लॉयन्स क्लब नागपूर यांचे संयुक्त विद्यमानाने दिनांक ०८ मार्च २०२१ रोजी धानोरा तालुक्यातील ग्यारापत्ती व कटेझरी या गावात महीला दिनाचा कार्यक्रम प्रथमच साजरा करण्यात आला.

जागतिक महीला दिनाच्या कार्यक्रमाच्या निमीत्ताने सर्वप्रथम दिपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. यावेळी मौजा कटेझरी व ग्यारापत्ती येथे भव्य रोगनिदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमादरम्यान गावातील महीलांनी उत्कृष्ट रांगोळ्या काढुन कार्यक्रम स्थळाची सजावट केली तसेच आदिवासी मुलींनी पारंपारिक गोंडी नृत्य सादर करुन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. पोलीस मदत केंद्र कटेझरीचे वतीने महीला व मुलांसाठी सामुहीक भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी लॉयन्स क्लब नागपुरचे वतीने पोमके ग्यारापत्ती येथील पोउपनि श्री जगन्नाथ मेनकुदळे व पोउपनि श्री विकास शेळके यांचा कोरोना योध्दा प्रमाणपत्र देवुन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास परिसरातील ३० गावातील अंदाजे ५०० पेक्षा जास्त महीला सहभागी झाल्या होत्या. गावात पहील्यांदाच महीला दिनाचा कार्यक्रम साजरा होत असल्यामुळे गावकरी, महीला व मुलांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले होते. यावेळी गडचिरोली पोलीस दल व लॉयन्स क्लब नागपुरचे वतीने महीलांना ब्लँकेट, साडया, सॅनिटरी नॅपकीन, मुलांना बेबी ब्लॅकेट अशा जीवनावश्यक साहीत्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी लॉयन्स क्लबच्या वतीने मा. एम.जे. एफ. सारंग ढोक, अध्यक्ष लॉयन्स क्लब लॉ. शैलेश डोमळे नागपुर तसेच पोमके ग्यारापत्ती व पोमके कटेझरी येथील प्रभारी अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता वरील दोन्ही पोलीस मदत केंद्राच्या अधिकारी व अंमलदारांनी अथक परिश्रम घेतले.





